# डॉ.एच.एन.सिन्हा महाविद्यालय, पातुर
## २०२०-२१
## मराठी विभाग
## वर्ग B.A.(II) (MLT)

# निवडक मराठी कथा

अध्यक्ष- डॉ.गजानन जाधव
संपादक मंडळ

डॉ. मनोज तायडे,डॉ.केशव फाले, डॉ.काशिनाथ बऱ्हाटे, डॉ.राजेंद्र हावरे, डॉ.अशोक कांबळे, डॉ.संतोष चव्हाण

प्रकाशक
राघव पब्लिशर्स अँन्ड डीस्ट्रीब्युटर्स
राजाविलास टॉकिज जवळ
महाल नागपूर-३२
शाखा – जबलपूर

## प्रस्तावना :-

**कथा हा कथात्मक साहित्याचा एक प्रकार आहे म्हणजे जी कथन केली जाते ती. आपण कथा या शब्दाला पर्याय म्हणून गोष्ट असेही म्हणू शकतो.गोष्ट ऐकण्याची आवड माणसाला उपजतच असते. आपण लहानपणापासूनच चिऊ-काऊच्या, प्राणी-पक्षांच्या, परी-राक्षसाच्या, राजपुत्राच्या-शौर्याच्या, ठकसेनच्या, पंचतंत्र, इसापनीतीच्या गोष्टी ऐकत असतो, त्यातून आपले कल्पनाविश्व विकसित आणि संस्कारित होत जाते.**

**या कथासंग्रात एकूण १० कथांचा समावेश आहे.यात प्रथम द.या. मिरासदार यांची माझ्या बापाची पेंड ही कथा आली आहे.**

# बापाची पेंड- दमा मिरासदार

बापाची पेंड हा मिरासदारांचा पहिला कथासंग्रह आहे, माणसामाणसात आढळणारा आपलेपणा, तन्हेवइकपणा, गाववेगळेपणा आणि त्यामुळे जीवनात येणारी रंगत हे त्यांचा कथेतून जाणवणारे महत्वाचे घटक आहेत, मिरासदाराना कथा रंगवून सांगण्याचे कसब लाभले आहे.

## ‘माय’ -उद्धव शेळके

या ठिकाणी त्यांची माय हा कथा त्यांच्या शिळान अधिक आठ कथा’ या कथासंग्रातून निवडली आहे. उद्धव शेळके हे विदर्भातील महत्वाचे ग्रामीण कथाकार आहेत.त्यांच्या कथेतून वऱ्हाड व विदर्भ यातील परिसर साकार झाला आहे.त्यांचा पहिला कथासंग्रह शिळान अधिक आठ कथा १९५८ साली प्रसिद्ध झाला, याशिवाय ‘वानगी’ घुसळण हे त्यांचे कथासंग्रह आहेत. विदर्भातील ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारे ते एकमेव कथाकार आहेत.

## मजल्यांच घर- वामन होवाळ

वामन होवाळ हे दळीत कथाक्षेत्रातील महत्वाचे कथाकार आहेत त्यांचे बेनवाड ‘येळकोट’ वारसदार, ‘बाटा आडवाटा आणि ऑडीट’ हे कथासंग्रह आहेत. या कथासंग्रहात त्यांची १९९३ साली प्रसिद्ध झालेली’ ‘मजल्याच घर’ ही काथा निवडलेली आहे

आत्मसात आलेली दलितांची नवी पिढी पारंपारिक मानसिकतेविरुद्ध शह द्यायला कशी सिद्ध होतेय याचेच चित्रण या कथेतून वामन होवाळांनी अंत्यंत संयमी भाषेत केलेले आहे.

# किडलेली माणसे- गंगाधर गाडगीळ

गंगाधर गाडगीळ यांनी आपले कथालेखन तसे १९४० सालीच सुरु केले.
मानसचित्रे, कडू आणि गोड, तलावातले चांदणे, कबुतरे,काजवा,पाळणा इत्यादी त्यांचे कथासंग्रह आहेत.त्याच त्या आशयाच्या जोखडात सापडलेल्या मराठी कथेला नवी दिशा देण्याचे काम त्यांच्या कथेनी केले आहे. ‘ किडलेली माणसे’ ही त्यांची कथा त्याच पठडीतली आहे.या कथेत दंगलीमधील क्षणचित्रे त्यांनी नेमकेपणाने टिपली आहेत.

# ‘ट्रायचा घोडा’ – जयंत नारळीकर

**मराठीमध्ये विज्ञानकथेचा प्रवाहही अत्यंत जोमदारपणे प्रवाहित झालेला आहे. हा प्रवाह ज्यांनी सशक्त केला त्यात जयंत नारळीकर महत्वाचे आहते.ट्रायचा घोडा’ ही कथा त्यांच्या’ यक्षाची देणगी’ या कथासंग्रहातून घेतलेली आहे. अर्थातच ती विज्ञानावर आधारित असलेली काल्पनिक कथा आहे. ही कथा २०५० साली घडली आहे अशी कल्पना लेखकाने केली आहे.**

# हुंदका – राजन गवस

१९८०  नंतरच्या काळातले महत्वाचे कथाकार म्हणून रजन गवसली ओळखले जातात.त्यांची ‘हुंदका’ ही कथा त्यांच्या ‘ रिवनावायली मुंगी’ या कथासंग्रातून घेतली आहे.
राजन गवस यांच्या ह्या कथेत वर्तमान ग्रामीण जीवनात अजूनही भाऊबंदकीच्या माध्यमातुन गाव दुभंगत आहे आणि त्यातून गरीब, दरिद्री असहाय माणसे कशी भरडली जातात आणि सगळ्या घराचाच इस्कोट होतो याच चित्र तपशिलाने  रेखाटले आहे.

## समारोप :-

माणसाला लेखनकला अवगत होण्यापूर्वी कथा मौखीक स्वरुपात सांगितली जात होती आणि कहाणी, लोककथा. परीकथा,नीतिकथ,नक्षत्रकथा, दैवतकथा इत्यादी स्वरुपात ती होती. या मौखीक कथेचे संस्कारमूल्य कौटुंबिक गरज ज्ञान संग्रहित करण्याचे प्राथमिक साधन आणि घटना जतन करण्याचे माध्यम होते.जगात सगळीकडे कथा अविरतपणे सांगितले जाते, लिहिली जाते कारण मानवी जीवनाशी सबंधित असलेल्या सर्व घटकांचा समावेश कथेमध्ये झालेला दिसून येतो निसर्गातील अनेक परीचे चमत्कार, वृक्ष,मुळे, फळे, पशु, पक्षी आणि स्वत: माणूस इत्यादी निर्मिती कथेतून प्रगट झाली.

## ॥ धन्यवाद ॥

## प्रा. सारिका पाचराऊत
## मराठी विभाग